<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

दिनांक 11.07.2019 रोजी सकाळी 11.30 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री खान फारुख अली इलीयाज खान, सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| अब्दुल शमीम अब्दुल्ला साब | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| येवनकर मोहीनी विजय | अ. लतीफ अ. मजीद |
| रावत भानुसिंह गयादिनसिंह | वैशाली मिलिंद देशमुख |
| कल्याणकर ज्योती किशन | सौ. कोकाटे करुणा भीमराव |
| वाघमारे दयानंद नामदेव | यन्नम राजेश लक्ष्मीनारायण |
| अ. रशीद अ. गणी | फारुख हुसेन कासीम पिरान |
| जाधव श्रीनिवास नारायण | |

**सभापती** — उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य उपआयुक्त प्रशासन सुधीर इंगोले, प्रभारी मुख्यलेखा परिक्षक श्रीमती शोभा मुंढे, मुख्यलेखाधिकारी सौ. अश्वविनी नरांजे, शहर अभियंता श्री माधव बाशेट्टी, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**मसुद अहेमद खान** — आमच्या प्रभागात 10 लाखाचे कामे काढण्यात यावी.

**अ. शमीम अब्दुल्ला** — प्रशासनाचे कामे करण्यात येत आहेत आमच्या कामाना बजेटचे नांव घालून कामे करण्यात येत नाहीत. उप आयुक्तांनी सांगावे की, इतर कामे काढण्यात येत आहेत किंवा नाही याचा खुलासा करावा. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. सर्वसाधारण सभेच्या समोर सादर करण्यात आले आहे त्यासाठी खर्च करण्यास आता काही हरकत नाही.

**उप आयुक्त (विकास)** — तातडीचे कामे केवळ करण्यात येत आहेत इतर कोणत्याही कामे करण्यात आली नाहीत.

**अब्दुल रशिद** — स्वेच्छा निधी कामे काढली पाहीजे. आता बजेट मध्ये मंजूरी दिलेली आहे ती कामे त्वरीत सुरु करावी. ब्रम्हपुरीचे टेन्डर निघाले आहे ते स्थायी समितीला का आले नाही याची माहीती देण्यात यावी.तसेच पाण्याची काय स्थीती आहे याची माहिती दयावी.

(नव्याने महापालिकेत रुजू झालेल्या मुख्य लेखाधिकारी व सहाय्यक संचालक नगररचना यांनी आपला परिचय करुन दिला)

**कार्यकारी अभियंता (पापु)** — आपल्याकडे आता जो पाणी साठा आहे तो साठा किमान एक महीना पुरेल एवढे पाणी आपल्याकडे उपलब्ध आहे.रात्रीच्या वेळी लाईटचा प्रश्न निर्माण झाला होता त्यामुळे पाणी पुरवठा करता आला नाही.

**अ. शमीम अब्दुल्ला** — आमच्या एरीयाला 10 दिवसानंतर ही पाणी मिळत नाही. त्यामुळे पाण्याचे योग्य नियोजन करावे. पाण्यासाठी नागरीकांना त्रास झाला याची काळजी प्रशासनाने घ्यावी. सहा दिवसाचे पाणी दहा दिवसानंतर देत आहात.

**फारुख बदवेल** — काही एरीयामध्ये आठ आठ तास पाणी देण्यात येत आहे.पाणी वेस्ट गेले नाही पाहीजे याची काळजी प्रशासनाने घ्यावी. एक ते दीड तास आमच्या कडे पाणी मिळते आणि काही एरीयात जास्त वेळ पाणी देण्यात येते हे योग्य नाही. आमच्या एरीयातील बोरचे काम गेल्या चार महीण्यापासुन होत आहे ते आतापर्यत झाले नाही ते केव्हा होणार हे सांगावे.

**सभापती** — पाण्याच्या संदर्भात प्रशासनाचे काय नियोजन आहे जर आपल्याकडे पाणी पडले नाही तर अशा परिस्थितीत आपले काय नियोजन असणार आहे या माहिती प्रशासनाने दयावी. पाच दिवसाच्या नंतरही पाणी मिळत नाही तर याचे कारण काय आहे. नागरीकांना पाणी मिळणे आवश्यक आहे.

**कार्यकारी अभियंता (पापु)** — पाण्याचे योग्य नियोजन करुन पाणी पुरवठा सुरळीत कसा राहील याची काळजी घेण्यात येईल.

**फारुख बदवेल** — आम्ही माहिती मागविली होती ती माहिती अदयापपर्यत देण्यात आलेल नाही.

**नगरसचिव** — मा. सभापती महोदयांची इतीवृतावर स्वाक्षरी झालेली नाही त्यामुळे इतीवृताची प्रत देता आली नाही तसे संबधीतास कळविले आहे. ज्या वेळी ठराव पास होतो त्यावेळी त्या ठरावावर मा. सभापती व नगरसचिव यांच्या स्वाक्षरीने ठराव प्रशासनाकडे पाठविण्यात येतो त्या वेळी प्रशासन त्या ठरावाची अंमलबजावणी करावी किंवा नाही हे प्रशासनाचा अधिकार आहे. प्रशासनास वाटले तर तो ठराव विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठविता येते.

**राजेश यन्नम** काम पुर्ण झाले नाही तरी वाढीव प्रस्तावास कशी काय मान्यता देता येईल. काम झाले असते तर वाढीव प्रस्ताव आला तरी पास करता आला असता पण त्या आधी प्रस्ताव आला हे कसे.

**विषय क्रं.01**

दिनांक 30.12.2017 ची विशेष सभा, दि. 08.01.18, 16.01.18, 07.02.18, 06.03.18 अंदाजपत्रकिय विशेष सभा, 28.03.18 दुपारी 03.00 व 04.00 वाजता अंदाजपत्रकिय विशेष सभा, 25.04.18, 25.05.18 रोजी दुपारी 04.00 व 4.30 वाजता, 04.07.18, 08.08.18 रोजी सकाळी 11.00 व 12.00 वाजता, 07.09.18, 12.10.2018, 26.11.18, 01.12.2018 व 18.12.18 विशेष सभेच्या मागील झालेल्या सर्व सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**सभापती** इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 01** **ठराव**

दिनांक 30.12.2017 ची विशेष सभा, दि. 08.01.18, 16.01.18, 07.02.18, 06.03.18 अंदाजपत्रकिय विशेष सभा, 28.03.18 दुपारी 03.00 व 04.00 वाजता अंदाजपत्रकिय विशेष सभा, 25.04.18, 25.05.18 रोजी दुपारी 04.00 व 4.30 वाजता, 04.07.18, 08.08.18 रोजी सकाळी 11.00 व 12.00 वाजता, 07.09.18, 12.10.2018, 26.11.18, 01.12.2018 व 18.12.18 विशेष सभेच्या मागील झालेल्या सर्व सभेचे इतिवृत्त कायम करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं.02**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत क्षेत्र-ब मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत क्षेत्र-ब अंतर्गत सालसन 2016-17 या वर्षात गणेश उत्सव, दुर्गा महोत्सव जयंती, पुण्यतिथी, ईद, दसरा, दिवाळी इत्यादी सणानिमित्त मुख्य व अंतर्गत रस्ते दुरुस्ती करिता देखभाल दुरुस्तीचे रुपये 80.68 लक्ष चे कामास निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवुन कंत्राटदार श्रध्दा इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग कंपनी नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा 0.28% कमी दराने कार्यारंभ आदेश जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6429/2016 दिनांक 16.08.2016 अन्वये आदेश देण्यात आले आहे.

क्षेत्र-ब अंतर्गत वर्षभरात गणपती उत्सव, दुर्गादेवी उत्सव, ईद, जयंती इत्यादी निमित्त झोन अंतर्गत कच्या रस्त्यावर GSB, मुरुम, किंवा 6 एमएम आवश्यकतेनुसार टाकुन रस्ते दुरुस्ती करण्यात आली. पावसाळयाच्या काळात पुर सदृष्य परिस्थीतीमध्ये श्रावस्तीनगर, बाबानगर, शाहुनगर, शिवनगर भागात ट्रॅक्टर, जेसीबी मशीन लावण्यात आली शहरातील असना नदी घाट सांगवी या ठिक्ाणी पुर आल्याने नदी घाटाच्या लगतची माती वाहुन गेली. त्यामुळे येथे असलेला बंधारा माती इंदिरा गांधी मैदानात टाकण्यात आली होती व देखभाल दुरुस्तीच्या कामा मधुन जेसीबी मशीन लावुन नदी काठ भरण्यात आला.

प्रत्यक्ष काम करत असतांना कांही बाबींच्या परिमानात खालील दर्शविल्यामुळे वाढ झालेली आहे.

| I.No. | Qty as per estimate | Description of Item | Rate (In Rs) | Unit | Amount (In Rs) | Qty as executed | Rate as estimate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 02 | 850.00 | Supplying & preading hard murum / kankar at the road side, including conveying and stacking etc. complete as directed by Engineer in charge Spec. No. Rd.23 Page No. 202 DSR I.No. 566 P.No. 124 | 691.44 | Cum | 587724.00 | 477.65 | 691.44 | 330266.32 |
| 03 | 100.00 | Providing and laying granular sub base (GSB 1 structural layer conforming etc.) | 1981.95 | Cum | 198195.00 | 1581.97 | 1981.95 | 315385.44 |
| 05 | 357.00 | Supplying 40 mm & spreading trap / granite / quartzite / gneiss stone size metal at the road side, including conveying and stacking etc. complete as directed by Engineer in charge. (including blasting) Spec. No. Rd.22 P.No. 201, DSR I.No.564 P.No.124 | 1062.84 | Cum | 379433.88 | 30.58 | 1062.84 | 32497.40 |
| 52 | 100.00 | Providing & fixing RCC chamber with frame in line & level at site etc. | 4000.00 | No. | 400000.00 | 10.00 | 4000.00 | 40000.00 |
| 53 | 12.00 | Supplying Hydra crane on eve of Shri Visharjan & Durga visharjan at river in nwcmc area etc. | 70000.00 | Day | 840000.00 | 12.00 | 70000.00 | 840000.00 |
| 54 | 650 | Supplying & fixing wooden baricating 3m c/c with 2m vertical wooden ballies and 3nos horizontal wooden ballies tied with jhut rope etc on eve of shri visharjan & Durga visharjan hallabol in nwcmc area etc. | 200.00 | Rgm | 130000.00 | 1160.00 | 200.00 | 232000.00 |
| 58 | 45.00 | Supplying tractor for convening material in nwcmc area etc. | 2400.00 | Day | 108000.00 | 560.00 | 2400.00 | 1344000.00 |
| 59 | 5.00 | Supplying power roller for compaction material in nwcmc area etc. | 3255.00 | Day | 16275.00 | 18.00 | 3255.00 | 58590.00 |
| 64 | 10.00 | Providing & fixing name board in granite stone at site etc. | 14000.00 | No. | 140000.00 | 1.00 | 14000.00 | 14000.00 |
| 65 | 5.00 | Providing & fixing M S board at site etc. | 11102.44 | Sqm | 55512.20 | 2.00 | 11102.44 | 22204.88 |
| 68 | 22.00 | Supplying tractor breaking machine for breaking cc work in nwcmc area etc. | 600.00 | Hour | 13200.00 | 72.00 | 600.00 | 32200.00 |
| 71 | 600.00 | Supplying 6mm trap granite quartzite gneiss stone metal etc,. | 954.35 | Cum | 572610.00 | 3251.74 | 954.35 | 3103298.07 |
| | | | | | **3440950.00** | | **TOTAL** | **9195442.10** |

पावसामुळे मुरुमाच्या पाणी साचल्याने खदानी बंद राहत होत्या दळणवळणाची आवश्यकता, वाहतुकीची गैरसोय होवु नये यासाठी व स. सदस्य, नागरीकांची मागणी लक्षात घेता तात्काळ GSB Material टाकवे लागले त्यामुळे GSB Material च्या Quantity मध्ये वाढ झाली.

वरील तपशिलानुसार झोन-ब अंतर्गत दुरुस्तीचे कामे करण्यात अली सदर कामाची मंजुर किमंत रुपये 80,67,907/- असुन प्रत्यक्षात वरील प्रमाणे रुपये 91,95,442/- इतका खर्च होत असुन रुपये 11,27,359/- ने वाढ झाली आहे कामाची तातडी क्षात घेता सदरचे काम देखभाल दुरुस्तीसाठी नियुक्त कंत्राटदार श्रध्दा इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग कंपनी नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे.

करिता या कामावर सुधारीत अंदाजपत्रक रुपये 91,95,359/- च्या रक्कमेस सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन वाढीव रक्कम रुपये 11,27,359/- अदा करण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 02** **ठराव**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत क्षेत्र-ब मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत क्षेत्र-ब अंतर्गत सालसन 2016-17 या वर्षात गणेश उत्सव, दुर्गा महोत्सव जयंती, पुण्यतिथी, ईद, दसरा, दिवाळी इत्यादी सणानिमित्त मुख्य व अंतर्गत रस्ते दुरुस्ती करिता देखभाल दुरुस्तीचे रुपये 80.68 लक्ष चे कामास निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवुन कंत्राटदार श्रध्दा इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग कंपनी नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा 0.28% कमी दराने कार्यारंभ आदेश जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6429/2016 दिनांक 16.08.2016 अन्वये आदेश देण्यात आले आहे.

क्षेत्र-ब अंतर्गत वर्षभरात गणपती उत्सव, दुर्गादेवी उत्सव, ईद, जयंती इत्यादी निमित्त झोन अंतर्गत कच्या रस्त्यावर GSB, मुरुम, किंवा 6 एमएम आवश्यकतेनुसार टाकुन रस्ते दुरुस्ती करण्यात आली. पावसाळयाच्या काळात पुर सदृष्य परिस्थीतीमध्ये श्रावस्तीनगर, बाबानगर, शाहुनगर, शिवनगर भागात ट्रॅक्टर, जेसीबी मशीन लावण्यात आली शहरातील असना नदी घाट सांगवी या ठिक्ाणी पुर आल्याने नदी घाटाच्या लगतची माती वाहुन गेली. त्यामुळे येथे असलेला बंधारा माती इंदिरा गांधी मैदानात टाकण्यात आली होती व देखभाल दुरुस्तीच्या कामा मधुन जेसीबी मशीन लावुन नदी काठ भरण्यात आला.

प्रत्यक्ष काम करत असतांना कांही बाबींच्या परिमानात खालील दर्शविल्यामुळे वाढ झालेली आहे.

| I.No. | Qty as per estimate | Description of Item | Rate (In Rs) | Unit | Amount (In Rs) | Qty as executed | Rate as estimate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 02 | 850.00 | Supplying & preading hard murum / kankar at the road side, including conveying and stacking etc. complete as directed by Engineer in charge Spec. No. Rd.23 Page No. 202 DSR I.No. 566 P.No. 124 | 691.44 | Cum | 587724.00 | 477.65 | 691.44 | 330266.32 |
| 03 | 100.00 | Providing and laying granular sub base (GSB 1 structural layer conforming etc.) | 1981.95 | Cum | 198195.00 | 1581.97 | 1981.95 | 315385.44 |
| 05 | 357.00 | Supplying 40 mm & spreading trap / granite / quartzite / gneiss stone size metal at the road side, including conveying and stacking etc. complete as directed by Engineer in charge. (including blasting) Spec. No. Rd.22 P.No. 201, DSR I.No.564 P.No.124 | 1062.84 | Cum | 379433.88 | 30.58 | 1062.84 | 32497.40 |
| 52 | 100.00 | Providing & fixing RCC chamber with frame in line & level at site etc. | 4000.00 | No. | 400000.00 | 10.00 | 4000.00 | 40000.00 |
| 53 | 12.00 | Supplying Hydra crane on eve of Shri Visharjan & Durga visharjan at river in nwcmc area etc. | 70000.00 | Day | 840000.00 | 12.00 | 70000.00 | 840000.00 |
| 54 | 650 | Supplying & fixing wooden baricating 3m c/c with 2m vertical wooden ballies and 3nos horizontal wooden ballies tied with jhut rope etc on eve of shri visharjan & Durga visharjan hallabol in nwcmc area etc. | 200.00 | Rgm | 130000.00 | 1160.00 | 200.00 | 232000.00 |
| 58 | 45.00 | Supplying tractor for convening material in nwcmc area etc. | 2400.00 | Day | 108000.00 | 560.00 | 2400.00 | 1344000.00 |
| 59 | 5.00 | Supplying power roller for compaction material in nwcmc area etc. | 3255.00 | Day | 16275.00 | 18.00 | 3255.00 | 58590.00 |
| 64 | 10.00 | Providing & fixing name board in granite stone at site etc. | 14000.00 | No. | 140000.00 | 1.00 | 14000.00 | 14000.00 |
| 65 | 5.00 | Providing & fixing M S board at site etc. | 11102.44 | Sqm | 55512.20 | 2.00 | 11102.44 | 22204.88 |
| 68 | 22.00 | Supplying tractor breaking machine for breaking cc work in nwcmc area etc. | 600.00 | Hour | 13200.00 | 72.00 | 600.00 | 32200.00 |
| 71 | 600.00 | Supplying 6mm trap granite quartzite gneiss stone metal etc,. | 954.35 | Cum | 572610.00 | 3251.74 | 954.35 | 3103298.07 |
| | | | | | **3440950.00** | | **TOTAL** | **9195442.10** |

पावसामुळे मुरुमाच्या पाणी साचल्याने खदानी बंद राहत होत्या दळणवळणाची आवश्यकता, वाहतुकीची गैरसोय होवु नये यासाठी व स. सदस्य, नागरीकांची मागणी लक्षात घेता तात्काळ GSB Material टाकवे लागले त्यामुळे GSB Material च्या Quantity मध्ये वाढ झाली.

वरील तपशिलानुसार झोन-ब अंतर्गत दुरुस्तीचे कामे करण्यात अली सदर कामाची मंजुर किमंत रुपये 80,67,907/- असुन प्रत्यक्षात वरील प्रमाणे रुपये 91,95,442/- इतका खर्च होत असुन रुपये 11,27,359/- ने वाढ झाली आहे कामाची तातडी क्षात घेता सदरचे काम देखभाल दुरुस्तीसाठी नियुक्त कंत्राटदार श्रध्दा इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग कंपनी नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे.

करिता या कामावर सुधारीत अंदाजपत्रक रुपये 91,95,359/- च्या रक्कमेस सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन वाढीव रक्कम रुपये 11,27,359/- अदा करण्यास करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीतील सार्वजनिक पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालु बंद करण्याचे काम स्थायी समिती ठराव क्रं. 166 दिनांक 27.11.2015 च्या मान्यतेने कार्यारंभ आदेश क्रं. उपअभि/11758/ 2015-16 दिनांक 10.12.2015 अन्वये तिन वर्षासाठी मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर यांना देण्यात आले होते व सदर कामाची मुदत दिनांक 09.12.18 रोजी संपली असल्याने व या कामासाठी नविन कंत्राटदाराची नेमणुक करणेसाठी निविदा प्रक्रिया चालु असल्याने मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर यांना मुदतवाढ आदेश क्रं. मनपा/विधुत/12354/2018-19 अन्वये दि. 10.12.2018 ते 09.01.2019 पर्यंत एक महिण्यासाठी मंजुर दरानुसार मुदतवाढ देण्यात आले होते व तदनंतर संबंधीतांना मुदतवाढ आदेश क्रं. मनपा/विधुत/14432/2018-19 दिनांक 07.01.2019 अन्वये दिनांक 10.01.2019 ते 09.02.2019 पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आले असता संबंधीतांना सदरील मुदतवाढ आदेश न घेता दिनांक 09.02.2019 रोजी काम बंद केले असल्यामुळे शहरातील बंद पथदिव्यांचे तक्रारी वेळेवर निपटारा करणेसाठी व सार्वजनिक पथदिवे बंद राहणार असल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होणार असल्याने नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीतील सार्वजनिक पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करण्याचे काम मा. स्थायी समिती ठराव क्रं. 166 व कार्यारंभ आदेश क्रं. उपअभि /विधुत/11728/2015-16 दिनांक 10.12.2015 अन्वये मंजुर दरानुसार मे. एशियन इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर नांदेड यांना रास्त पध्दतीने कार्यारंभ आदेश क्रं. मनपा/विधुत/14648/2018-19 दिनांक 10.01.2019 अन्वये देण्यात आले असता या कामासाठी नविन खाजगी कंत्राटदार यांची नेमणुक होईपर्यंत म्हणजे संबंधीतांनी सदरील काम दिनांक 10.01.2019 ते दिनांक 19.02.2019 पर्यंत एकूण 41 पूर्ण करुन या कामासाठी त्यांनी मंजुर दरानुसार रुपये 17,27,084/- दिनांक 22.02.2019 ची देयक सादर केले आहे.

संबंधीतांचे देयक अदा करावयाचे असल्याने या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसूची (ड) प्रकरण-5 कलम 2 अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करणेसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मान्यतेचा प्रस्ताव सादर केलेला असुन त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 03** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीतील सार्वजनिक पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालु बंद करण्याचे काम स्थायी समिती ठराव क्रं. 166 दिनांक 27.11.2015 च्या मान्यतेने कार्यारंभ आदेश क्रं. उपअभि/11758/ 2015-16 दिनांक 10.12.2015 अन्वये तिन वर्षासाठी मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर यांना देण्यात आले होते व सदर कामाची मुदत दिनांक 09.12.18 रोजी संपली असल्याने व या कामासाठी नविन कंत्राटदाराची नेमणुक करणेसाठी निविदा प्रक्रिया चालु असल्याने मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर यांना मुदतवाढ आदेश क्रं. मनपा/विधुत/12354/2018-19 अन्वये दि. 10.12.2018 ते 09.01.2019 पर्यंत एक महिण्यासाठी मंजुर दरानुसार मुदतवाढ देण्यात आले होते व तदनंतर संबंधीतांना मुदतवाढ आदेश क्रं. मनपा/विधुत/14432/2018-19 दिनांक 07.01.2019 अन्वये दिनांक 10.01.2019 ते 09.02.2019 पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आले असता संबंधीतांना सदरील मुदतवाढ आदेश न घेता दिनांक 09.02.2019 रोजी काम बंद केले असल्यामुळे शहरातील बंद पथदिव्यांचे तक्रारी वेळेवर निपटारा करणेसाठी व सार्वजनिक पथदिवे बंद राहणार असल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होणार असल्याने नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीतील सार्वजनिक पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करण्याचे काम मा. स्थायी समिती ठराव क्रं. 166 व कार्यारंभ आदेश क्रं. उपअभि /विधुत/11728/2015-16 दिनांक 10.12.2015 अन्वये मंजुर दरानुसार मे. एशियन इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर नांदेड यांना रास्त पध्दतीने कार्यारंभ आदेश क्रं. मनपा/विधुत/14648/2018-19 दिनांक 10.01.2019 अन्वये देण्यात आले असता या कामासाठी

नविन खाजगी कंत्राटदार यांची नेमणुक होईपर्यंत म्हणजे संबंधीतांनी सदरील काम दिनांक 10.01.2019 ते दिनांक 19.02.2019 पर्यंत एकूण 41 पूर्ण करुन या कामासाठी त्यांनी मंजुर दरानुसार रुपये 17,27,084/- दिनांक 22.02.2019 ची देयक सादर केले आहे.

संबंधीतांचे देयक अदा करावयाचे असल्याने या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसूची (ड) प्रकरण-5 कलम 2 अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 04**

**विषय** :- श्री शांताराम सगणे जलतरणिका येथील डे टाईल्स व जलतरणिकेतील टाईल्स नव्याने बसविणेच्या वाढीव कामास अतिरिक्त बाबीसह मान्यता देणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील श्री शांताराम सगणे जलतरणिका येथील डेक टाईल्स व जलतरिणकेतील टाईल्स नव्याने बसविणेचे काम सद्यस्थितीत प्रगतीपथावर असुन जलतरणिका तलावातील तसेच Decl Area परिसरातील अस्तित्वातील नादरुस्त टाईल्स अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार पुर्णपणे काढून टाकल्या आहेत सदर टाईल्स काढुन टाकल्यानंतर खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

1- टाईल्स काढल्यानंतर आरसीसी पडदीचा पृष्ठभाग समतल नसुन ब-याच प्रमाणावर आत-बाहेर आहे.

2- सदर पडदीच्या काँक्रेटची तपासणी केली असता पडदीचे काँक्रेट कांही भागात नादुरुस्ती झाल्याचे दिसुन येते.

3- जलतरणिका तलावाच्या बेड स्लॅब जवळपास 150 ठिकाणी नादुरुस्त असल्यामुळे सदर भागातुन पाणी पाझरत आहे.

4- तलावाच्या बाजुने अस्तित्वात असलेली Gutter ची फरशी बदलण्यासाठी त्यावरील स्लॅब तोडणे आवश्यक आहे.

5- तलावातील मुख्य Gutter कांही ठिकाणी नादरुस्त झाल्याने त्याचीही Strengthening करणे आवश्यक आहे.

6- पडतीचा पृष्ठभाग समतल करण्यासाठी Water Proof साहीत्य वापरुन गिलावा करणे आवश्यक आहे.

7- तलावातील काँक्रेटची Strengthening करण्यासाठी Chemical Grouting करणे आवश्यक आहे. तसेच जलतरणीकेच्या Clorine युक्त पाण्याचा परिणाम होऊ नये यासाठी U.V. Coating करणे आवश्यक आहे.

8- सदर तलावाचे देखभालीचे काम प्रत्यक्ष बांधकामानंतर प्रथमच होत आहे त्यामुळे वरील बाबी हाती घेतल्यास तलावाचे आयुष्यमान वाढणार आहे या बाबी हाती घेणे आवश्यक आहेत.

9- राज्य दरसुची मध्ये Swimming Tiles चा अंतर्भाव नसल्यामुळे दरसुचीतील सिरॅमिक टाइल्स IS/15622/2006 (Group D II A) नुसार व जाडी 7 ते 8 मी.मी. यानुसार ठेवण्यात आली होती. तथापि सदर Standard प्रमाणे फरशी बाजारपेठेत उपलब्ध नाही. याकरिता Swimming Tiles साठी योग्य टाईल्सची बाजारपेठेत चाचणी केली असता Jhonson कंपनीची टाईल्स एकमेव असल्यामुळे विक्रेत्याकडुन दरपत्रक तसेच नमुने मागविण्यात आले संबधीतांनी सदर फरशीचे Test Reports सादर केले आहेत. बाजारपेठे उपलब्ध इतर नमुन्याशी तुलना करण्याच्या दृष्टीने सदरचे नमुने गुणवत्ता तपासणीसाठी शासकीय तंत्रनिकेतन येथे पाठविण्यात आले आहे.

10- Jonson कंपनीची टाईल्स एकमेव Swiming Tiles असल्यामुळे प्राप्त दरपत्रकानुसार दरविश्लेषण करण्यात आले आहे.

11- सदर जलतरणीकेचे काम अत्याधुनिक पध्दतीने व गुणवत्ता पुर्वक कण्याच्या दृष्टीने तसेच अस्तित्वातील टाईल्स काढल्यानंतर काँक्रेटची गुणवत्ता व पाण्याची गळती समजणार असल्यामुळे वरील तपशलानुसार अंदाजपत्रकातील कांहीही बाबी कमी करुन अतिरिक्त बाबी हाती घेणे आवश्यक आहे.

12- जलतरणिका तलावालगत असलेल्या डायव्हीग बोर्डची सद्यस्थिती लक्षात घेता सदर डायव्हींग बोर्डची क्षमता तपासणी करणे आवश्यक असल्यामुळे स्ट्रक्चरल अभियंता यांचेकडून क्षमता तपासणी करण्यसात आली आहे. प्राप्त अहवालानुसार डायव्हींग बोर्ड मोठया प्रमाणावर क्षतिग्रसत झाल्यामुळे तोडणे आवश्यक आहे.

वरील तपशलानुसार खालील अतिरिक्त बाबी हाती घेणे आवश्यक आहे.

a) Johnson swimming tiles पुरवठा करुन बसविणे

b) Chemical Grouting करणे

c) Diving Board तोडण्यासाठी Rich Mix Concrete Removing

d) गिलावा – 20 mm thick

e) अस्तित्वातील एम.एस. रेलिंग पुर्णपणे सडल्यामुळे नविन एस.एस रेलिंग बसविणे.

f) तलावाच्या भिंतीना U.V. Coating करणे

g) आर.सी.सी. बिम एम-20

सदर कामाचे मुळ मंजुर अंदाजपत्रक रुपये 76,67,200/- चे असुन वरील अतिरिक्त बाबीमुळे अंदाजपत्रकीय किमंती मध्ये रुपये 25,48,500/- ची वाढ होत आहे. यानुसार कामाची एकूण रुपये 1,02,15,700/- होत आहे.

करिता सदर वाढीव रक्कम रुपये 25,48,500/- यासह वर नमुद अतिरिक्त 07 बाबीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या सभेपुढे सादर.

**राजेश यन्नम** वाढीव प्रस्तावाची रक्कम 25 लक्ष रुपये आहे ही रक्कम खुप मोठी आहे. आम्ही एक काम सांगतो ते काम होत नाही. प्रशासनाचे 25 लक्षाच्या कामास कशी मंजूरी दयावी हे सांगावे. तसेच इस्टीमेटमध्ये काय नमुद करावे आपणास कसे कळाले नाही. गल्लीमध्ये आम्हाला एक कामे होत नाही.

**कार्यकारी अभियंता(सांबावि)** जलतरणीकेचे अंदाजपत्रक तयार करते वेळी जलतरणीकेत पाणी होते.

**भानुसिंह रावत** हा विषय पास करुन टाका. मी एक विषय ठेवला होता त्यास केवळ 4 लक्ष रुपये खर्च येणार होता, ते काम आता पर्यत काम पुर्ण झाले नाही याचा खुलासा करावा.

**अब्दुल रशिद/अब्दुल लतीफ** एक फाईल किती वेळ जावी याचे काही बंधन असले पाहीजे कितीही वेळा संचिका ही दक्षता समिती कडे जात आहे. जास्त वेळ संचिका गेल्यामुळे कामे होतांना दिसत नाहीत.

**राजेश यन्नम** आपण जे काम सुचवितो त्या कामाचे काय. यांच्यासाठी आपण मान्यता देतो, ज्या वेळी आयुक्त येतील त्या वेळी आपले कामे झाली पाहीजे.सर्व सदस्य मिळून आयुक्ताकडे जावून आपल्या संचिका या मंजूर करुन घ्यावे असे मला वाटते.

**कार्यकारी अभियंता साबांवि** श्री शांताराम सगणे जलतरणिका येथे डे टाईल्स व जलतरणिकेतील टाईल्स नव्याने बसविण्यासाठी वाढीव कामास अतिरिक्त बाबच्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केलेला असुन तसेच सदरचे काम हे अंतिम होई पर्यंत लागणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी जेणे करुन जलतरणिका हा जुनी असल्याने सदरचे काम बंद पडणार नाही अशी विनंती आहे.

**सभापती** कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सुचविल्यानुसार मनपाकेच्या जलतरणिकेचा वाढीव कामास व सदरचे काम अंतीम होईल पर्यंत लागणा-या खर्चास मान्यता देण्याबाबत विनंती केलेली असल्याने त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

ठराव क्रं. 04 **ठराव**

**विषय** :- श्री शांताराम सगणे जलतरणिका येथील डे टाईल्स व जलतरणिकेतील टाईल्स नव्याने बसविणेच्या वाढीव कामास अतिरिक्त बाबीसह मान्यता देणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील श्री शांताराम सगणे जलतरणिका येथील डेक टाईल्स व जलतरिणकेतील टाईल्स नव्याने बसविणेचे काम सद्यस्थितीत प्रगतीपथावर असुन जलतरणिका तलावातील तसेच Decl Area परिसरातील अस्तित्वातील नादरुस्त टाईल्स अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार पुर्णपणे काढून टाकल्या आहेत सदर टाईल्स काढुन टाकल्यानंतर खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

1- टाईल्स काढल्यानंतर आरसीसी पडदीचा पृष्ठभाग समतल नसुन ब-याच प्रमाणावर आत-बाहेर आहे.

2- सदर पडदीच्या काँक्रेटची तपासणी केली असता पडदीचे काँक्रेट कांही भागात नादुरुस्ती झाल्याचे दिसुन येते.

3- जलतरणिका तलावाच्या बेड स्लॅब जवळपास 150 ठिकाणी नादुरुस्त असल्यामुळे सदर भागातुन पाणी पाझरत आहे.

4- तलावाच्या बाजुने अस्तित्वात असलेली Gutter ची फरशी बदलण्यासाठी त्यावरील स्लॅब तोडणे आवश्यक आहे.

5- तलावातील मुख्य Gutter कांही ठिकाणी नादरुस्त झाल्याने त्याचीही Strengthening करणे आवश्यक आहे.

6- पडतीचा पृष्ठभाग समतल करण्यासाठी Water Proof साहीत्य वापरुन गिलावा करणे आवश्यक आहे.

7- तलावातील काँक्रेटची Strengthening करण्यासाठी Chemical Grouting करणे आवश्यक आहे. तसेच जलतरणीकेच्या Clorine युक्त पाण्याचा परिणाम होऊ नये यासाठी U.V. Coating करणे आवश्यक आहे.

8- सदर तलावाचे देखभालीचे काम प्रत्यक्ष बांधकामानंतर प्रथमच होत आहे त्यामुळे वरील बाबी हाती घेतल्यास तलावाचे आयुष्यमान वाढणार आहे या बाबी हाती घेणे आवश्यक आहेत.

9- राज्य दरसुची मध्ये Swimming Tiles चा अंतर्भाव नसल्यामुळे दरसुचीतील सिरॅमिक टाइल्स IS/15622/2006 (Group D II A) नुसार व जाडी 7 ते 8 मी.मी. यानुसार ठेवण्यात आली होती. तथापि सदर Standard प्रमाणे फरशी बाजारपेठेत उपलब्ध नाही. याकरिता Swimming Tiles साठी योग्य टाईल्सची बाजारपेठेत चाचणी केली असता Jhonson कंपनीची टाईल्स एकमेव असल्यामुळे विक्रेत्याकडुन दरपत्रक तसेच नमुने मागविण्यात आले संबधीतांनी सदर फरशीचे Test Reports सादर केले आहेत. बाजारपेठे उपलब्ध इतर नमुन्याशी तुलना करण्याच्या दृष्टीने सदरचे नमुने गुणवत्ता तपासणीसाठी शासकीय तंत्रनिकेतन येथे पाठविण्यात आले आहे.

10- Jonson कंपनीची टाईल्स एकमेव Swiming Tiles असल्यामुळे प्राप्त दरपत्रकानुसार दरविश्लेषण करण्यात आले आहे.

11- सदर जलतरणीकेचे काम अत्याधुनिक पध्दतीने व गुणवत्ता पुर्वक कण्याच्या दृष्टीने तसेच अस्तित्वातील टाईल्स काढल्यानंतर काँक्रेटची गुणवत्ता व पाण्याची गळती समजणार असल्यामुळे वरील तपशलानुसार अंदाजपत्रकातील कांहीही बाबी कमी करुन अतिरिक्त बाबी हाती घेणे आवश्यक आहे.

12- जलतरणिका तलावालगत असलेल्या डायव्हीग बोर्डची सद्यस्थिती लक्षात घेता सदर डायव्हींग बोर्डची क्षमता तपासणी करणे आवश्यक असल्यामुळे स्ट्रक्चरल अभियंता यांचेकडून क्षमता तपासणी करण्यसात आली आहे. प्राप्त अहवालानुसार डायव्हींग बोर्ड मोठया प्रमाणावर क्षतिग्रसत झाल्यामुळे तोडणे आवश्यक आहे.

वरील तपशलानुसार खालील अतिरिक्त बाबी हाती घेणे आवश्यक आहे.

h) Johnson swimming tiles पुरवठा करुन बसविणे

i) Chemical Grouting करणे

j) Diving Board तोडण्यासाठी Rich Mix Concrete Removing

k) गिलावा – 20 mm thick

l) अस्तित्वातील एम.एस. रेलिंग पुर्णपणे सडल्यामुळे नविन एस.एस रेलिंग बसविणे.

m) तलावाच्या भिंतीना U.V. Coating करणे

n) आर.सी.सी. बिम एम-20

सदर कामाचे मुळ मंजुर अंदाजपत्रक रुपये 76,67,200/- चे असुन वरील अतिरिक्त बाबीमुळे अंदाजपत्रकीय किमंती मध्ये रुपये 25,48,500/- ची वाढ होत आहे. यानुसार कामाची एकूण रुपये 1,02,15,700/- होत आहे. सदर वाढीव रक्कम रुपये 25,48,500/- यासह वर नमुद अतिरिक्त 07 बाबीस व काम अंतिम होई पर्यंत लागणा-या खर्चास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 05**

**विषय :-** **<u>नावाशमनपा हद्यीत आय.टी.आय समोर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे</u>**

नावाशमनपा हद्यीत आय.टी.आय. समोर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणेसाठी रुपये 55,45,000/- चे कामास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/3152/2018 दिनांक 06.06.2018 अन्वये मान्यता झाल्या प्रमाणे निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवुन कंत्राटार बी.जी. भास्करे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा मंजुर करुन कार्यारंभ आदेश जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/7425/2018 दिनांक 28.08.2018 अन्वये देण्यात आले आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळा परिसराचे सुशाभिकरण कामा अंतर्गत वाढीव Columns, Beams B.B. Masonary work, Concrete walls, Mural Boxes, Plastering, Colouring, Railings, Clay Filling for Plantation, Patch work, Painting Foot, Paths इत्यादी कामात वाढ झाल्यामुळे त्यानुसार बांधकाम करणेसाठी सुधारीत अंदाजपत्रक सालसन 217-18 नुसार तयार केले असुन कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार त्यामध्ये रुपये 8,44,698/- ची वाढ होत आहे.

करिता सदर कामाची मंजुर किमंत रु. 55,45,000/- + वाढीव किमंत रुपये 8,44,698/- = 63,89,698/- साठी सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन वाढीव काम रुपये 8,44,698/- या मान्यतेस्तव मनपा स्थायी समितीच्या सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 05** **ठराव**

**विषय :-** **<u>नावाशमनपा हद्यीत आय.टी.आय समोर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे</u>**

नावाशमनपा हद्यीत आय.टी.आय. समोर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणेसाठी रुपये 55,45,000/- चे कामास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/3152/2018 दिनांक 06.06.2018 अन्वये मान्यता झाल्या प्रमाणे निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवुन कंत्राटार बी.जी. भास्करे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा मंजुर करुन कार्यारंभ आदेश जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/7425/2018 दिनांक 28.08.2018 अन्वये देण्यात आले आहे.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळा परिसराचे सुशाभिकरण कामा अंतर्गत वाढीव Columns, Beams B.B. Masonary work, Concrete walls, Mural Boxes, Plastering, Colouring, Railings, Clay Filling for Plantation, Patch work, Painting Foot, Paths इत्यादी कामात वाढ झाल्यामुळे त्यानुसार बांधकाम करणेसाठी सुधारीत अंदाजपत्रक सालसन 217-18 नुसार तयार केले असुन कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार त्यामध्ये रुपये 8,44,698/- ची वाढ होत आहे.

करिता सदर कामाची मंजुर किमंत रु. 55,45,000/- + वाढीव किमंत रुपये 8,44,698/- = 63,89,698/- साठी सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते तसेच वाढीव काम रुपये 8,44,698/- ला हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 06**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 17 अंतर्गत पावडेवाडी नाका भागात राजश्री शाहु महाराज यांच्या पुतळयाची स्थापना व परिसर सुशोभिकरण करणे

नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 17 अंतर्गत पावडेवाडी नाका भागात राजश्री शाहु महाराज यांच्या पुतळयाची स्थापना व परिसर सुशोभिकरण करणेसाठी रुपये 1,10,73,046/- चे कामास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/17730/2017

दिनांक 27.03.2017अन्वये मान्यता झाल्या प्रमाणे निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवुन कंत्राटदार शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/4076/2017 दिनांक 22.06.2017 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले.

सल्लागार फोरट्रेस अडवायजरी सर्विसेस यांनी दिनांक 01.03.2019 रोजी पत्र देवुन पावडेवाडी नाका भागात राजश्री शाहु महाराज यांच्या पुतळयाची स्थापना व परिसर सुशोभिकरण करणेच्या कामाचे अतिरिक्त बाबीचे तसेच अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा वाढीव रक्कम रुपये 16,75,200/- चे अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह मान्यतेसाठी सादर केले आहे. अंदाजपत्रकात सदर कामाच्या परिसरात पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने विंधन विहीर, कमान व चबुत-यासाठी Texture Plaster पट्टी यासह बोर्ड बसविणे, जुने प्लास्टर व विट बांधकाम काढणे यासह सुधारीत अंदाजपत्रक सालसन 2017-18 नुसार तयार करुन सदर कामे असुन त्यानुसार रुपये 16,75,200/- ची वाढ होत आहे.

करिता सदर कामाची मंजुर किमंत रुपये 1,10,73,046/- + वाढीव किमंत रुपये 16,75,200/- असे एकूण रुपये 1,27,48,246/- साठी सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन वाढीव काम रुपये 16,75,200/- यास अतिरिक्त बाबीसह मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**ज्योती कल्याणकर** — वस्तुसेवा कर मंजुर किमंत व वाढीव रक्कमेवर लागु करुन संबंधीतांचे देयक अदाई करण्यात यावी अशी दुरुस्ती करुन मान्यता देण्यात यावी.

**सभापती** — श्रीमती ज्योती कल्याणकर यांनी सुचविल्यानुसार दुरुस्ती प्रस्तावासह प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 06** **ठराव**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 17 अंतर्गत पावडेवाडी नाका भागात राजश्री शाहु महाराज यांच्या पुतळयाची स्थापना व परिसर सुशोभिकरण करणे

नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 17 अंतर्गत पावडेवाडी नाका भागात राजश्री शाहु महाराज यांच्या पुतळयाची स्थापना व परिसर सुशोभिकरण करणेसाठी रुपये 1,10,73,046/- चे कामास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/17730/2017 दिनांक 27.03.2017अन्वये मान्यता झाल्या प्रमाणे निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवुन कंत्राटदार शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/4076/2017 दिनांक 22.06.2017 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले.

सल्लागार फोरट्रेस अडवायजरी सर्विसेस यांनी दिनांक 01.03.2019 रोजी पत्र देवुन पावडेवाडी नाका भागात राजश्री शाहु महाराज यांच्या पुतळयाची स्थापना व परिसर सुशोभिकरण करणेच्या कामाचे अतिरिक्त बाबीचे तसेच अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा वाढीव रक्कम रुपये 16,75,200/- चे अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह मान्यतेसाठी सादर केले आहे. अंदाजपत्रकात सदर कामाच्या परिसरात पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने विंधन विहीर, कमान व चबुत-यासाठी Texture Plaster पट्टी यासह बोर्ड बसविणे, जुने प्लास्टर व विट बांधकाम काढणे यासह सुधारीत अंदाजपत्रक सालसन 2017-18 नुसार तयार करुन सदर कामे असुन त्यानुसार रुपये 16,75,200/- ची वाढ होत आहे.

करिता सदर कामाची मंजुर किमंत रुपये 1,10,73,046/- + वाढीव किमंत रुपये 16,75,200/- असे एकूण रुपये 1,27,48,246/- साठी सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व वाढीव काम रुपये 16,75,200/- यास अतिरिक्त बाबीसह वस्तुसेवा कर मंजुर किमंत व वाढीव रक्कमेवर लागु करुन संबंधीतांचे देयक अदाई करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव या च सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 07**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्यइमारती मधील हाऊस किपींग कामा बाबतचे ई-निविदा मागविण्यात आले असता ई-निविदा प्रापत झाल्यानुसार सदरील संस्थेचे निविदा फायनान्सीयन बिड उघडण्यात आली असता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारक | निविदा संख्या | निविदा रक्कम | संख्या | एकूण रक्कम | इतर खर्च | प्रति महा निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | मे. भारती असो. पुणे | 1) व्यवस्थापक<br>2) कुशलकामगार<br>3) अकुशलकामगार | 14613<br>13968<br>13968 | 01<br>12<br>13 | 14613<br>167616<br>181584 | 12105 | 375918 |
| 02 | ओमसाई स्व. सं. नांदेड | 1) व्यवस्थापक<br>2) कुशलकामगार<br>3) अकुशलकामगार | 11541<br>11541<br>11541 | 01<br>12<br>13 | 11541<br>138492<br>150033 | 2200 | 302266 |

तरी वरील प्रमाणे मे. भारती असो. पुणे यांची प्रतिमहा निविदा रक्कम रुपये 3,75,918/- इतकी असुन **ओम साई स्वयंरोजगार सुरक्षा रक्षक व इतर सेवापुरवठा स.सं. नांदेड** यांची निविदा रक्कम रुपये 3,02,266/- सर्वात कमी निविदा दाखल केलेली आहे त्यामुळे मनपा स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**मालमत्ता व्यवस्थापक** मुख्य इमारती मधील हाऊस किपींगचे काम सर्वात कमी दराचे आलेली निविदा ओम साई स्वयंरोजगार सुरक्षा रक्षक व इतर सेवापुरठा स. सं. नांदेड यांना सदरच्या दरावर पुढील 03 वर्षाचे कामे करण्यासाठी मान्यता देण्यात यावी

**सभापती** मालमत्ता व्यवस्थापक यांनी सुचविल्यानुसार उक्त कंत्राटदारास पुढील 03 वर्षासाठी मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 07** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्यइमारती मधील हाऊस किपींग कामा बाबतचे ई-निविदा मागविण्यात आले असता ई-निविदा प्रापत झाल्यानुसार सदरील संस्थेचे निविदा फायनान्सीयन बिड उघडण्यात आली असता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारक | निविदा संख्या | निविदा रक्कम | संख्या | एकूण रक्कम | इतर खर्च | प्रति महा निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | मे. भारती असो. पुणे | 1) व्यवस्थापक<br>2) कुशलकामगार<br>3) अकुशलकामगार | 14613<br>13968<br>13968 | 01<br>12<br>13 | 14613<br>167616<br>181584 | 12105 | 375918 |
| 02 | ओमसाई स्व. सं. नांदेड | 1) व्यवस्थापक<br>2) कुशलकामगार<br>3) अकुशलकामगार | 11541<br>11541<br>11541 | 01<br>12<br>13 | 11541<br>138492<br>150033 | 2200 | 302266 |

तरी वरील प्रमाणे मे. भारती असो. पुणे यांची प्रतिमहा निविदा रक्कम रुपये 3,75,918/- इतकी असुन **ओम साई स्वयंरोजगार सुरक्षा रक्षक व इतर सेवापुरवठा स.सं. नांदेड** यांची निविदा रक्कम रुपये 3,02,266/- सर्वात कमी निविदा मंजुर करण्यात येते. तसेच संबंधीत एजन्सीची मुदत संपल्यानंतर मुख्य इमारती मधील हाऊस किपींगवर विपरीत परिणाम होवु नये व दुर्गंधी होवु नये यासाठी संबंधीतास एजन्सीला पुढील 03 वर्षासाठी काम देण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 08**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. 10 गोविंदनगर भागात राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते कृष्णा चौक पर्यंत सी.सी. रस्ता करणे रुपये 38,55,000/-

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता जा.क्रं. 2019/नपाप्र/टे-6/लो.अ.भा.स.ना.व./मनपा/सिआर-35 दि. 22.02.2019

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊसाठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. 10 गोविंदनगर भागात राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते कृष्णा चौक पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 38,55,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/17128/2019 दिनांक 25.02.19 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/ दैनिक तहेलका टाईम्स (उर्दु) या वृत्तपत्रात दिनांक 26.02.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द दिनांक 28.05.19 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | जैनब कन्सट्रक्शन नांदेड | 0.20% कमी दर |
| 02 | एस.एस. कन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जैनब कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.20% कमी दराची आहे. **करिता सदर कामासाठी जैनब कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.20% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर**.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 08** **ठराव**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. 10 गोविंदनगर भागात राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते कृष्णा चौक पर्यंत सी.सी. रस्ता करणे रुपये 38,55,000/-

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता जा.क्रं. 2019/नपाप्र/टे-6/लो.अ.भा.स.ना.व./मनपा/सिआर-35 दि. 22.02.2019

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊसाठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. 10 गोविंदनगर भागात राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते कृष्णा चौक पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय

मान्यता दिल्यानुसार रुपये 38,55,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/17128/2019 दिनांक 25.02.19 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/ दैनिक तहेलका टाईम्स (उर्दु) या वृत्तपत्रात दिनांक 26.02.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द दिनांक 28.05.19 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | जैनब कन्सट्रक्शन नांदेड | 0.20% कमी दर |
| 02 | एस.एस. कन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जैनब कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.20% कमी दराची आहे. **करिता सदर कामासाठी जैनब कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.20% कमी दराची निविदा** हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 09**

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 20 मध्ये डॉ. मुंदडा ते पंचशिल बौध्दविहार ते हडको-400 मी. लांब व 09 मी. रुंद सि.सि. रस्ता करणे (रुपये 60,00,000/-)

“ महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद “ योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 20 मध्ये डॉ. मुंदडा ते पंचशिल बौध्दविहार हडको-400 मी. लांब व 09 मी. रुंद सी.सी. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 60,00,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/17702/2019 दिनांक 07.03.2019 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय) / दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय) / दैनिक रिपब्लीक गार्ड या वृत्तपत्रात दिनांक 08.03.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 04.06.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 1.10% कमी दर |
| 02 | श्री पठाण मोईज अहेमद खान नांदेड | 15.50% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजत्रकीय दरापेक्षा 1.10% कमी दराची आहे.

करिता सदर कामासाठी **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.10% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 09** **ठराव**

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 20 मध्ये डॉ. मुंदडा ते पंचशिल बौध्दविहार ते हडको-400 मी. लांब व 09 मी. रुंद सि.सि. रस्ता करणे (रुपये 60,00,000/-)

“ महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद “ योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 20 मध्ये डॉ. मुंदडा ते पंचशिल बौध्दविहार हडको-400 मी. लांब व 09 मी. रुंद सी.सी. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 60,00,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/17702/2019 दिनांक 07.03.2019 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय) / दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय) / दैनिक रिपब्लीक गार्ड या वृत्तपत्रात दिनांक 08.03.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 04.06.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 1.10% कमी दर |
| 02 | श्री पठाण मोईज अहेमद खान नांदेड | 15.50% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजत्रकीय दरापेक्षा 1.10% कमी दराची आहे.

करिता सदर कामासाठी **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.10% कमी दराची निविदा** हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 10**

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजना अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 20 मध्ये श्री असारी पाटील घोगरे यांचे घर ते बि.एच.एम.एस कॉलेज पर्यंत सि.सि. रस्ता करणे ( रुपये 60,00,000/-)

**महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 20 मध्ये श्री असारी पाटील घोगरे यांचे घर ते बि.एच.एम.एस कॉलेज पर्यंत सि.सि. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 60,00,000/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/17702/2019 दिनांक 07.03.2019 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/दैनिक रिपब्लीकन गार्ड या वृत्तपत्रात दिनांक 08.03.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 04.06.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 1.10% कमी दर |
| 02 | श्री पठाण मोईज अहेमद खान नांदेड | 15.72% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 1.10% कमी दराची आहे.

करिता सदर कामासाठी **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.10% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर**.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला निविदा मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 10** **ठराव**

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजना अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 20 मध्ये श्री असारी पाटील घोगरे यांचे घर ते बि.एच.एम.एस कॉलेज पर्यंत सि.सि. रस्ता करणे ( रुपये 60,00,000/-)

**महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 20 मध्ये श्री असारी पाटील घोगरे यांचे घर ते बि.एच.एम.एस कॉलेज पर्यंत सि.सि. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 60,00,000/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/17702/2019 दिनांक 07.03.2019 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/दैनिक रिपब्लीकन गार्ड या वृत्तपत्रात दिनांक 08.03.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 04.06.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 1.10% कमी दर |
| 02 | श्री पठाण मोईज अहेमद खान नांदेड | 15.72% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 1.10% कमी दराची आहे.

करिता सदर कामासाठी **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.10% कमी दराची निविदा** हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील नागरीकांना पाणी पट्टीच्या कर आकारणी मध्ये दरवर्षी 10% पाणी पट्टी बिलात वाढ करण्यात येते त्याची सविस्तर माहिती स्थायी समितीच्या सभे समोर सादर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला, दयानंद वाघमारे, खान मसुद अहेमद खान **अनुमोदक**:- अ. लतीफ अ. मजीद, अ.रशीद अ.गणी

**अ. शमीम अब्दुल्ला** पाणी पटटीत वाढ करण्यात येवू नये जे प्रतीवर्षी 10 टक्के वाढ करण्याचा जो प्रस्ताव आहे तो प्रस्ताव पास करण्यात येणार नाही. दर वर्षी 10 टक्के वाढ म्हणजे किती रुपये वाढ करणार आहेत कारण कोणत्याही शहरात एवढी पाणी कराची वसुली केली जात नाही त्यासाठी यावर्षी पासुन पाणी करात कपात करण्यात यावी. वाढ करण्यात येवू नये. पेपरला जाहीरात गेली पाहीजे. कोणतीही वाढ करण्यात आली म्हणुन सर्व लोकांना माहिती मिळाली पाहीजे. अनाधिकृत नळ जोडणी केली आहे त्यांना त्वरीत नळ जोडणी करुन दयावी त्यातुन आपले उत्पन्न वाढ होवू शकते.

**भानुसिंग रावत** नदीला पाणी नाही लोकांना वेळेवर पाणी मिळत नाही तरी वाढ करणे चुक आहे. या वर्षी वाढ करु नये, पुढच्या वर्षीचा पुढील वर्षी विचार करण्यात येईल.

**सभापती** बजेटच्या मिटींग मध्ये आपण कोणत्याही कराची वाढ सुचविली नाही त्यामुळे सन 2018 नंतर कोणतीही पाणी करात वाढ करण्यात येवू नये.

**अ. शमीम अब्दुल्ला** ज्या लोकांवर केस दाखल केली आहे, ती केस मागे घेण्यात यावी व नळ जोडणी रेग्युलर करावी. जर एखादा व्यक्ती नळाचे पाणी घेत असेल तर त्याला त्याच ठीकाणी तपासणी करुन त्याच्याकडून पैसे घेवून नळ नियमीत करावा.यातुन मनपाचे उत्पन वाढ होईल.

**सभापती** पाणी कराच्या संदर्भात यापुर्वी दोन ते तीन ठराव पारीत करण्यात आले, परंतु त्यावर प्रभावि अंमलबजावणी झालेली नाही. आता त्या ठरावावर प्रभाविपणे अमंलबजावणी करावी.दोन वर्षात केवळ 3500 नळ अनाधिकृत नियमीत केले आहे त्याची स्पीड वाढ करावी जेणे करुन महापालिकेचे उत्पन्नात वाढ झाली पाहीजे. नळ हे अनाधिकृत घेतले असल्याने जे टॅक्स भरतात त्यांना आपण पाणी देवू शकत नाही. त्यामुळे आपणास जास्त वेळ पाणी सोडावे लागत तेंव्हा कोठे शेवटच्या लोंकाना पाणी मिळते तेही पाणी पुरेसे मिळते याची शाश्वती नाही. लोकांना पाण्यापासुन वंचीत राहता कामा नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

**अ. शमीम अब्दुल्ला** महापालिकेच्या मालमत्ता कर वसुली लिपीकांना कोणाकडे नळ आहे आणि कोणाकडे नळ याची पुर्ण माहिती आहे त्यामुळे एका आठ दिवसाच्या आत अंदाजे 50 हजार नळ जोडणी होवू शकते. पण प्रशासन यावर गांर्भियाने विचार करतांना दिसत नाही.

**अब्दुल रशिद** घरांना घर नंबर देण्यात येत नाही हा विषय यापुर्वी उप आयुक्तांना सांगीतला होता परंतू अदयापपर्यंत यावर कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

**उपआयुक्त(महसुल)** घर नंबर देण्यासाठी झोनल अधिकारी यांना अधिकार आहेत त्यांनी कार्यवाही करीत नसतील तर त्यांना शोकॉज काढण्यात येईल. भोगवटदार म्हणुन घर नंबर देण्यात येतील.

**अ. शमीम अब्दुल्ला** अमृत योजने अंतर्गत ड्रेनेजचा डीपीआर मागील दिड वर्षापासुन होत आहे तो डीपीआर आतापर्यंत का पुर्ण करण्यात आला नाही. किती दिवस हा डीपीआर तयार करण्यास लागणार आहे याची माहिती देण्यात यावी.

**भानुसींह रावत** वसुली लिपीकाला सर्व वार्डातील माहिती आहे त्याला टारगेट दिले पाहीजे. टारगेट देवून काम करुन घेणे आवश्यक आहे. जर त्यांने टारगेट जर पुर्ण केले नाही तर त्याला निलंबीत करावे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील शहरवासीयांना पाणी पट्टीच्या कर आकारणी मध्ये प्रशासना मार्फत दरवर्षी 10% पाणी पट्टीच्या बिलात वाढ करण्यात येत असल्यामुळे मनपाकेच्या स्थायी समितीच्या अंदाजपत्रकिय विशेष सभा दिनांक 08.03.19 ठराव क्रं 137 नुसार पाणी पट्टीच्या करात सालसन 2018-19 चे दर जशास तेसे कायम करुन कुठलेही पाणी करात वाढ होणार नसल्याचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. सदरील ठरावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागा मार्फत अमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास असल्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे.

**अ. शमीम अब्दुल्ला** तथापि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील मालमत्ता धारकांना पाणीपट्टी कर आकारणीच्या बिलात जे दरवर्षी 10% वाढ करण्यात येत होते सालसन 2018-19 च्या आर्थीक वर्षा पासुन यापुढे कोणत्याही प्रकारच्या पाणीपट्टी वाढ करण्यात येवु नये असी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच शहरातील ज्यांच्या घरात अनाधिकृतपणे नळ घेतलेला आहे अशांचा शोध बिल कलेक्टर यांच्या मार्फत करुन संबंधीत मालमत्ता धारकांकडे घर क्रमांक नसलातरीही ते मनपाकेचा पाणी घेत असल्यामुळे मनपाकेच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीकोणातुन ज्यांच्याकडे अनाधिकृत नळ आहे त्यांना पाणी पट्टी येत नसेल तर अशांना भोगवटाधारक म्हणुन त्यांचे नावाने चालु वर्षाचे पाणी पट्टी संबंधीत मालमत्ता धारकाकडुन वसुल करुन त्यांचे नळ नियमीत करण्यास मान्यता देण्यात यावी

| | |
|---|---|
| **सभापती** | श्री भानुसिंह रावत व श्री अ. शमीम अब्दुल्ला यांनी सुचविल्यानुसार दुरुस्ती प्रस्तावासह मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. |

**ठराव क्रं. 11** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील शहरवासीयांना पाणी पट्टीच्या कर आकारणी मध्ये प्रशासना मार्फत दरवर्षी 10% पाणी पट्टीच्या बिलात वाढ करण्यात येत असल्यामुळे मनपाकेच्या स्थायी समितीच्या अंदाजपत्रकिय विशेष सभा दिनांक 08.03.19 ठराव क्रं 137 नुसार पाणी पट्टीच्या करात सालसन 2018-19 चे दर जशास तेसे कायम करुन कुठलेही पाणी करात वाढ होणार नसल्याचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. सदरील ठरावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागा मार्फत अमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास असल्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे.

तथापि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील मालमत्ता धारकांना पाणीपट्टी कर आकारणीच्या बिलात जे दरवर्षी 10% वाढ करण्यात येत होते सालसन 2018-19 च्या आर्थीक वर्षा पासुन यापुढे कोणत्याही प्रकारच्या पाणीपट्टी वाढ करण्यात येवु नये असी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच शहरातील ज्यांच्या घरात अनाधिकृतपणे नळ घेतलेला आहे अशांचा शोध बिल कलेक्टर यांच्या मार्फत करुन संबंधीत मालमत्ता धारकांकडे घर क्रमांक नसलातरीही ते मनपाकेचा पाणी घेत असल्यामुळे मनपाकेच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीकोणातुन ज्यांच्याकडे अनाधिकृत नळ आहे त्यांना पाणी पट्टी येत नसेल तर अशांना भोगवटाधारक म्हणुन त्यांचे नावाने चालु वर्षाचे पाणी पट्टी संबंधीत मालमत्ता धारकाकडुन वसुल करुन त्यांचे नळ नियमीत करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 12** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील शासनाच्या अमृत योजना राबविण्यात येत असुन सदरील योजने अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारणच्या कामाची सद्यस्थिती काय आहे याची सविस्तर माहिती स्थायी समितीच्या सभे समोर सादर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला, दयानंद वाघमारे, खान मसुद अहेमद खान **अनुमोदक**:- अ. लतीफ अ. मजीद, अ.रशीद अ.गणी

| | |
|---|---|
| **राजेश यन्नम** | अमृत योजने अंतर्गत मंजूर डीपीआरमध्ये 132 किमी पाण्याची लाईन टाकावयाची होती ती लाईन कोणत्या ठिकाणी टाकण्यात आली ती माहिती दयावी तसेच लेबर कॉलनीतील ही लाईन टाकण्यात आली आता लोकांना रस्त्यावर चालता येत नाही मी वारंवार फोन करुन ती लाईनचे रिस्टोरेशन करा असे सांगीतले परंतू काम काही करत नाहीत अर्धवट काम कंत्राटदाराने केले आहे हे काम कधी करुन देणार हे सांगावे. |
| **कार्यकारी अभियंता(पापु)** | सध्या पाणी टंचाई असल्याने पाणीच्या लाईनचे क्रास कनेक्शन केले नाही. 90 किमी लाईनचे काम पुर्ण करुन टेस्टींग करण्यात आली त्या लाईनच्या सहाय्याने पाणी देण्यात येत आहे. इतर ठिकाणी लाईन टाकण्यात येणार आहे व त्याची टेस्टींग करुन पाणी देण्यात येणार आहे. |
| **राजेश यन्नम** | मागील 25 दिवसापासुन श्रीनगर भागात पाणी मिळत नाही ही गोष्ट मी सांगत आहे तरीही काम करण्यात येत नाही. सर्वसाधारण सभेमध्ये देखील हा विषय काढला होता परंतू त्यावेळी उत्तर असे आले होते. हे अमृत योजनेत काम केले असते तर चांगले झाले असते.कंत्राटदार काम करीत नसेल तर त्याला दंड लावण्यात यावा. |
| **कार्यकारी अभियंता(पापु)** | कंत्राटदाराला दंड आकारण्यात आला आहे व त्याच्या बिलातून 13 लक्ष रुपये कपात करुन घेतले आहे. |
| **सभापती** | राजेश यन्नम व अब्दुल रशीद सदस्य यांचे काम 15 दिवसात पुर्ण करुन घ्यावे नसता आपल्या विरुध्द 15 दिवसांनतर कार्यवाही करण्यात येईल. |
| **अब्दुल रशीद** | अमृत योजनेअंतर्गत झाडे लावण्यात येत होती माझ्या प्रभागामध्ये एकही झाड लावण्यात आलेले नाही. त्याबाबत एक समिति गठीत करण्यात आली होती त्याची चौकशी करण्यात यावी परंतू ती चौकशी झाली की नाही याची माहिती देण्यात यावी. आम्हाला साईटवर घेवून गेले होते त्याचा अहवाल दिलेला नाही असे कळले आहे. मग आम्हाला साईटवर का घेवून गेले. त्या ठिकाणी किती झाडे जळून गेली याचा अहवाल देण्यात यावा. कंत्राटदारास पेमेट करण्यात येत आहे. त्याला वर्क आर्डर देवूनही काम होत नाही. शासनाच्या पैश्याचा उपयोग योग्य विनियोग झाला पाहीजे. |
| **सभापती** | संबधीत कंत्राटदाराचे पेमेट किती केले व त्याने किती झाडे जगविली याची माहिती पुढील मिटींग मध्ये देण्यात यावी. |
| **कार्यकारी अभियंता पापु** | अमृत योजने अंतर्गत शहरातील 132 कि.मी. पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे काम चालु असून उर्वरीत शिल्लक असलेली लाईन टाकण्याचे काम त्वरीत हाती घेण्यात येईल. |

**कार्यकारी अभियंता म.नि.** दक्षिण व उत्तर अशा दोन भागाचा DPR चे काम चालु असून मलनिस्सारण लाईन टाकण्याचे काम त्वरीत पुर्ण करण्यात येईल.

**सभापती** कार्यकारी अभियंता पापु व मलनिस्सारण यांनी शहरातील पाण्याची पाईप लाईन व मलनिस्सारणची पाईप लाईन प्रभाग निहाय कोठे टाकण्यात आली व कोठे टाकण्याचे काम शिल्लक आहे याची सविस्तर माहिती स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना तात्काळ लेखी स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं. 12** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील शासनाच्या अमृत योजने अंतर्गत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व कार्यकारी अभियंता मलनिस्सारण यांनी पाणी पुरवठा व मलनिस्सारणच्या पाईप लाईन टाकण्याचे काम चालु असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे त्यानुसार प्रभाग क्रं. 01 ते 20 मध्ये कोठुन ते कोठ पर्यत पाण्याची व मलनिस्सारणाची पाईप लाईन टाकण्यात आली व कोठुन ते कोठ पर्यत शिल्लक आहे याची रुंदीसहीत सविस्तर लेखी माहिती स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना पुढील स्थायी समितीच्या सभेपुर्वी देण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विनापरवानगी बांधकाम व मंजुर नकाशा विरुध्द होत असलेल्या बांधकामाची सविस्तर माहिती स्थायी समितीच्या सभे समोर सादर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला, दयानंद वाघमारे, खान मसुद अहेमद खान **अनुमोदक**:- अ. लतीफ अ. मजीद, अ.रशीद अ.गणी

**फारुख बदवेल** शहरात मोठया प्रमाणात नकाशाविरुध्द बांधकाम करण्यात येत आहे. त्यावर कोणत्याही अधिकाऱ्याचे नियंत्रण नाही, त्याचे बांधकाम थांबविण्यात येते नाही. काही लोक तर विना परवानगी बांधकाम करीत आहेत त्यांचे कामे का थांबविण्यात येत नाही. यामुळे महापालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. यासाठी बांधकाम परवानगी देण्यात यावी यातूनही आपले उत्पन्न वाढ होईल.

**सहाय्यक संचालक नगररचना** दिनांक 1 एप्रील ते आता पर्यत महानगरपालिकेकडून 269 बांधकाम परवानगी देण्यात आलेल्या आहेत.

**सभापती** शहरात किती बांधकामे चालू आहेत याची माहिती देण्यात यावी सदर माहिती क्षेत्रिय अधिकारी यांनी दयावी.तसेच जी बांधकामे झाली त्यापैकी कीती पाडण्यात आली.

**क्षेत्रिय अधिकारी झोन क्र 1** क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत सन 2011 पासुन आता पर्यत 860 अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. 18 बांधकामे पाडण्यात आली आहेत.

**अब्दुल रशिद** शहरात जी अनाधिकृत बांधकामे होत आहेत ती खुप मोठया प्रमाणात आहेत. गुठेवारी बंद आहे, बांधकामे नियमित करण्यासाठी काही तर ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. दोन रुम जास्तीच्या आहेत तर तेव्हढेच बांधकामास शास्ती लावण्यात यावी.

**उप आयुक्त (महसुल)** अनाधिकृत बांधकाम शास्ती ही एमएमअक्टच्या 267 (अ) लावण्याची तरतूद आहे. जर अनाधिकृत बांधकाम असेल तर त्याला डबल टॅक्स आकारण्यात यावा अशीही तरतूद कायदयात आहे. त्यानुसार 2012 - 13 ला डबल टॅक्स आकारण्यात आला आहे. सोलापुर महापालिकेच्या धर्तीवर टॅक्स आकारण्यात येणार आहे. असेसमेंट केल्यानंतर ती बाब लागू करता येईल. तसे मा. आयुक्तांनी आदेशही निर्गमित केले आहे. शासनाने एक एजन्सी फीक्स केली होती परंतू त्यांनी टॅक्स काही योग्य लावलेला नाही. पुन्हा नव्याने कार्यवाही करावी लागणार आहे.

**अब्दुल रशीद** दरवर्षी टॅक्स लावत आहोत ते योग्य नाही. एका वर्षी टॅक्स लावला की पुन्हा टॅक्स लावत आहोत. दोन रुम जास्तीच्या आहेत त्याला टॅक्स लावण्यात यावा.

**सभापती** एकदा जर जास्तीचा टॅक्स घेतला तर पुन्हा त्यास नव्याने टॅक्स लावत आहोत हे योग्य नाही. कायदयात काय तरतूद आहे याची तपासणी करुन कर आकारण्यात यावा.

**अ. अब्दुल शमीम अब्दुल्ला** बांधकाम परवानगी महापालिका देते आणि त्या कामावर नियंत्रण म्हणुन आर्कीटेक्ट पहात असतो. तो आर्कीटेक्ट हा परवानगी मिळाल्या नंतर आठ दिवसात त्याचा परवाना मागे घेतो त्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात याचा खुलासा करावा.

**सहाय्यक संचालक नगररचना** ज्या आर्कीटेक्टचा नकाशावर सही आहे त्यांनी त्या कामावर नियंत्रण करण्याची जबाबदारी त्याची आहे. बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणप्रत्र घेतले पाहीजे व काम पुर्ण झाल्यानंतर त्यांने अंतिम प्रमाणपत्र घेणे त्यास बंधनकारक आहे पण असे प्रमाणपत्र घेत असतांना दिसत नाहीत.

**उप आयुक्त (महसुल)** आर्किटेक्टची बांधकाम पुर्ण होईपर्यत त्याची जबाबदारी येते. तो जर विड्राल करुन घेतले तर त्यावर कार्यवाही करण्यात यावी जेणे करुन शहरात होणार अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवता येईल. आर्किटेक्ट हा कामावरील नियंत्रण हे विड्राल करीत असेल तर त्याचा परवाना रदद करावा.

**सभापती** जे बांधकाम परवानगी दिल्यानंतर विड्राल करुन घेतात त्यांचे परवाना हा रदद करावा. सहाय्यक संचालक नगररचना यांनी ही कार्यवाही करावी.

**फारुख बदवेल** आपल्याकडे बांधकाम परवानगी देण्यास विलंब लागतो त्यामुळे लोक काम सुरु करतात त्यासाठी बांधकाम परवानगी ही किती दिवसात निर्गमित करण्यात येते याची माहिती देण्यात यावी.

**सहाय्यक संचालक नगररचना** सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन आहे. जर नागरीकांने कागदपत्राची पुर्तता केली तर आपण त्यास त्वरीत 40 दिवसाचे आत परवानगी देतो.

**सभापती** आर्किटेक्टवर पुर्ण जबाबदारी टाकण्यात यावी. कागदपत्र सादर करीत असतांना त्यांने पुर्णपणे प्रस्ताव सादर करावा. कागदपत्राची त्रुटी राहू नये ही जबाबदारी त्याच्यावरच टाकण्यात यावी. इमारत पुर्ण होईपर्यत आर्किटेक्टचे सुपरव्हिजन असावे अशी अट त्याच्यावर टाकावी. मध्येच सोडून गेल्यास त्याच्यावर कार्यवाही करावी, तसेच नकाशा विरुध्द काम होत असेल तर आर्किटेक्ट हा जीमेदार राहील.

**फारुख बदवेल** बांधकाम परवानगी मिळाली नसल्याने तो काम सुरु करुन पुर्ण करतो त्यावर आपले नियंत्रण आवश्यक आहे.

**भानुसिंह रावत** प्लीन्थ लेवलपर्यतची बांधकाम परवानगी देण्यात यावी त्यानंतर झोनल अधिकारी यांनी त्या कामाची पहाणी करावी त्यानंतरच पुढील बांधकाम परवानगी देण्यात यावी. सर्व बिल्डर हे जास्तीचे बांधकाम करीत आहेत, त्याच्यावर नियंत्रण ठेवता येईल.

**फारुख बदवेल** ड्रेनेजचे लेबर आपल्याकडून कंत्राटदार हा 10 ची मंजूरी देण्यात आली आहे. परंतू प्रत्येक्षात कमी लोक काम करतात. त्यामुळे आपले आर्थिक नुकसान होत आहे कार्यकारी अभियंता यांनी नियंत्रण ठेवावे.

**अ.अब्दुल शमीम अब्दुल्ला** मनपाने चार लहाण जेटींग मशीनची खरेदी केली आहे त्या मशीनवर वाहनचालक मनपाचे आहेत काय, की जेटींग मशीन बंद असल्याचे माहीती मिळाली आहे.

**कार्यकारी अभियंता** चार लहान जेटींग मशीन मनपाने खरेदी केल्या आहेत त्या वर आरअन्डबी या कंपनी वाहन चालक घेतले आहे, त्यांच्या कडून या गाडया चालविण्यात येत आहे.

**अ.अब्दुल शमीम अब्दुल्ला** आरअन्डबी या कंपनीचे वाहन चालक न घेता त्यावर मनपा कडून वाहन चालकाची भरती करण्यात यावी.

**फारुख बदवेल** डॉक्टर लाईन मध्ये पार्कीगचा फार मोठा प्रश्न निर्माण होत आहे त्यांचे जे दवाखाने आहेत त्याच्या खाले अंडर ग्राऊंड पार्कीग करण्यात यावी जेणे करुन रस्त्यावर वाहन थांबणार नाहीत. यामुळे ट्रॅफीकची समस्या सुटू शकेल.

**भानुसिंह रावत** डॉक्टरांनी त्यांच्या दवाखान्यासमोर बॅरेगेट लावले आहे त्यामुळे ट्रफीकला त्रास होत आहे ते बॅरेगेट काढून टाकावे.

**उप आयुक्त (अतिक्रमण)** डॉक्टर लाईनचा विषयी मनपाने एक मोठी कारवाई हाती घेतली होती, सदर प्रकरणात स्टे आहे आता त्यात काय स्टेटस आहे याची माहीती घेवून पुढील कार्यवाही करता येईल, सन्मान प्रेस्टीजच्या बाजूला उत्तर बाजूने जी मोकळी जागा ती पे अन्ड पार्क म्हणुन आपण दिली आहे.

**भानुसींह रावत** डॉक्टर लेनचा जो ले आऊट टाकण्यात आला आहे त्या ले आऊटमध्ये मनपाचे कर्मचारी रहातात त्या ठिकाणी ओपन स्पेस दाखविली आहे हे चुक आहे.मनपाने त्यात काही अक्शन घेतली नाही.

**उप आयुक्त (महसुल)** डॉक्टर लेन मध्ये आपण 6000 क्युअर फुट जागा आपल्या ताब्यात घेतली आहे. त्या ठिकाणी पार्कीग करता येईल तसेच त्या जागेवर वाहने लावण्यासाठी डॉक्टरांना सांगण्यात येईल.

**भानुसींह रावत** डॉक्टर लेनच्या विषयी प्रशासनाने कार्यवाही हाती घ्यावी त्यांनी ती अंतीम केली पाहीजे.

**फारुख बदवेल** डॉक्टर कडे जे रुग्ण येतात त्यांच्यासाठी वाहन तळ सुध्दा नाही ते वाहन तळ त्यांनी करावे असे मला वाटते. लहान इमारतीवर कार्यवाही करण्यात येते मोठया इमारती प्रशासन सोडून देते हे योग्य नाही.

**उपआयुक्त (महसुल)** अनाधिकृत बाधंकामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी राजपत्रात प्रसिध्द झाल्यानुसार क्षेत्रीय अधिका-यावर आहे

**सहाय्यक संचालक न.र.** मालमत्ता धारकांनी बांधकाम परवानगीसाठी संचिका सादर केलेल्या असुन त्यानुसार 269 परवानग्या देण्यात आलेले असुन 13-14 बांधकाम परवानग्या तांत्रीक कारणामुळे प्रलंबीत असुन लवकरच निकाली काढण्यात येईल.

**सभापती** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विनापरवानगी बांधकाम करणा-या मंजुर नकाशा विरुध्द बांधकाम करणा-या मालमत्ता धारकां विरुध्द कायदेशीर कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच नगररचना विभागात मालमत्ताधारकांनी बांधकाम परवानगी प्राप्त करण्यासाठी Architect मार्फत आपल्या बांधकाम परवानग्या दाखल करतेवेळेस आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी Architect यांना आदेशीत करावा जेणे करुन मालमत्ताधारकांना त्रास होणार नाही. त्यानुसार Architect मार्फत बांधकाम परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यावर नगररचना विभागाने 01 महिण्याच्या आत संबंधीत मालमत्ताधारकांना बांधकाम परवानगी मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.** 13 **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विनापरवानगी बांधकाम करणा-या मंजुर नकाशा विरुध्द बांधकाम करणा-या मालमत्ता धारकां विरुध्द कायदेशीर कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच नगररचना विभागात मालमत्ताधारकांनी बांधकाम परवानगी प्राप्त करण्यासाठी Architect मार्फत आपल्या बांधकाम परवानग्या दाखल करतेवेळेस आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी Architect यांना आदेशीत करावा जेणे करुन मालमत्ताधारकांना त्रास होणार नाही. त्यानुसार Architect मार्फत बांधकाम परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यावर नगररचना विभागाने 01 महिण्याच्या आत संबंधीत मालमत्ताधारकांना बांधकाम परवानगी देण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.** 14 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आजपर्यंत एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी किती प्रस्ताव वैध आहेत वैध प्रस्तावापैकी किती प्रस्तांवाना बांधकामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले, याची सविस्तर माहिती सभागृहास देण्यास मान्यता देण्यात येते.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला **अनुमोदक**:- दयानंद वाघमारे, खान मसुद अहेमद खान

**शहर अभियंता** शासनाकडून आतापर्यत 7331 घराना मंजूरी प्राप्त झाली असुन 1600 लाभार्थ्यांनां आपण बांधकाम परवानगी दिली आहे 1065 घराचे काम प्रगती पथावर आहे. 65 घराचे काम पुर्ण झाली आहेत. डीपीआर 13 चे काम चालू आहे त्यात जवळपास 1500 घराचा समावेश आहे.

**अव्दुल लतीफ** बांधकाम परवानगी व कागदपत्र तयार करण्यासाठी संबधीत लोक हे दिड महीना संचीका त्यांच्याकडे प्रलबिंत ठेवत आहेत त्यावर प्रशासनाचे काय नियंत्रण असल्याचे दिसुन येत नाही. हे नियंत्रन ठेवणे गरजेचे आहे. गरीब लोक मनपाकेत फीरत आहेत.त्यांचे प्रश्न सोडविला पाहीजे.

**अब्दुल शमीम** पीएमसीने आतापर्यत कीती कोटीचे डीपीआर तयार केले आहे. पीएमसीने किती डीपीआर तयार केले हे याची माहिती दयावी.

**शहर अभियंता** पीएमसीने आतापर्यत 12 डीपीआर तयार केले आहे. ते मंजुर झाले आहे. आपल्याकडे 46 हजार प्रस्ताव आलेले आहेत. एएचपी मध्ये 25 हजार घरे आहेत.20 घराचे लाभार्थ्यी हा प्रत्यक्ष बांधकाम करणार आहे. 20 हजारापैकी 12 हजाराचा सर्व्हेचे काम पुर्ण झाले आहे. 7331 घरे मंजूर झाले आहे.

**अब्दुल शमीम** पुरग्रस्त म्हणुन आपण सोडून दिले आहे त्या लोकांना लाभ कसा देणार हे सांगावे.

**शहर अभियंता** पुर लाईनमध्ये ज्याचे घरे आहेत त्यांना परवानगी देत नाही परंतू पुर रेषेच्या लो प्लअड लाईनमध्ये आठ फुट उंच पीलर ठेवावे अशी परवानगी देत आहोत.

**भानुसींह रावत** 1945 ला ही पुर रेषा ठरविण्यात आली आहे. त्यामुळे आता सर्व नाले बंद झाले असल्याने आता पुर रेषा बदलण्यात यावी व लोकांना घराचा फायदा करुन दयावा.

**सहाय्यक संचालक नगररचना** प्लअड लाईनबाबत सर्व्हेचे काम चालू आहे. त्याबाबत बैठकाही घेण्यात येत आहे ती लाईन निश्चीत झाल्यानंतर पुढील आपणास कार्यवाही करता येईल.

**फारुख बदवेल** शहरात मोठया नाल्यावर घरे बांधली आहेत त्या मुळे मोठे नाले हे लहान झालेले आहेत.ही परवानगी कशी काय देण्यात आली हे कळत नाही. असे बांधकामास परवानगी देण्यात येवू नये. पावसाचे पाणी कसे जाईल, बालाजी नाल्यावर लोकांनी घरे बांधली आहे.

**सभापती** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रभाग क्रं. 01 ते 20 प्रभागनिहाय अर्ज संख्या, मंजुर झाले अर्जाची संख्या, नामंजुर झालेले अर्जाची संख्या किती, लाभार्थ्यांना घरकुलांचे किती आदेश देण्यात आले त्याची संख्या, घरकुंले किती पुर्ण झाले याची सविस्तर वरील नमुद केल्यानुसार लेखी माहिती स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना पुढील होणा-या स्थायी समितीच्या सभेपुर्वी देण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 14** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रभाग क्रं. 01 ते 20 प्रभागनिहाय अर्ज संख्या, मंजुर झाले अर्जाची संख्या, नामंजुर झालेले अर्जाची संख्या किती, लाभार्थ्यांना घरकुलांचे किती आदेश देण्यात आले त्याची संख्या, घरकुंले किती पुर्ण झाले याची सविस्तर वरील नमुद केल्यानुसार लेखी माहिती स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना पुढील होणा-या स्थायी समितीच्या सभेपुर्वी देण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 15** **अपिल** **दि. 11.06.19 प्राप्त दि. 24.06.19**

**प्रति,**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती,** नावाशमनपा नांदेड

**विषय** :- दिनांक 16.02.17 ते 26.07.17 हया निलंबन काळात आस्थापनाच्या कार्यालयात सहीनिशी हजर होते म्हणुन सदरचा निलंबन काळा हा सेवाकाळ एकूण 161 दिवसाचा समाविष्ठ करुन त्याचा पगार मिळणे बाबत

**महोदय,**

मी, अर्जदार श्रीमती महामती गौतमी हंकारे प्रभारी मुख्याध्यापिका सध्या सेवानिवृत असून मी मनपा प्रा.शा. भिमसंदेश कॉलनी नांदेड येथे प्रभारी मुख्याध्यापिका या पदावर कार्यरत होते. सेवेच्या कर्तव्य काळात असतांना माझ्यावर (शिस्त व अपिल) 1979 नियमा मधील नियम 08 तरतुदीनुसार आरोप कायम करुन कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर सदरील नोटीसीचे स्पष्टीकरण उत्तर मुदतीच्या आत दिले होते तरी पण संबंधीत अधिका-यांनी वरिष्ठ अधिका-यांच्या पुर्व परवानगी न घेता मला नोटीस पाठविली होती. त्या नोटीसचे उत्तरही दिले होते त्या उत्तराचा विचार न करता वरिष्ठांनी माझ्या विरुध्द खाते चौकशी चालु करुन मला निलंबन दि. 16.02.17 ते 26.07.17 पर्यंत सदरच्या निलंबनाच्या काळात मी दि. 27.06.17 रोजी सुध्दा नोटीसचे स्पष्टीकरण उत्तर दिले होते. पहिल्या नोटीसचे उत्तर देवुनही उत्तराकडे जाणुन बुजुन निलंबन करण्याच्या उद्देशाने वरिष्ठांनी माझ्या विरुध्द खाते चौकशी चालु करुन निलंबन केले व सदरच्या निलंबन काळात मी आस्थापनाच्या कार्यालयात सहीनिशी हजर होते व त्याचा कालावधी 161 दिवस म्हणजे 05 महिणे 16 दिवस उपस्थित होते. म्हणुन सदरचा निलंबन काळा हा सेवाकाळ म्हणुन समजावे. शाळेतदील गैरहजेरी सेवा काळ समजावी अशी तरतुदच असुन मी तर गैरहजर नसुन आस्थापनाच्या कार्यालयात सहीनिशी निलंबनाचे 161 दिवस उपस्थित होते. माझ्यावर लादलेले दोषारोप 01 ते 04 मा. डॉ. मधुकर गिरी विशेष चौकशी अधिकारी लातुरच्या दिनांक 20.02.18 च्या अहवालात मध्ये कोणताही दोषारोप पुर्णतः माझ्यावर सिध्द होत नाही चौकशी अधिका-यांनी अंशतः दोषारोप क्रं. 03 हा सिध्द होतो म्हणुन दिनांक 05 फेब्रुवारी 19 रोजी चौकशी अहवालानुसार प्रशासनाने आदेश दिला तो मला मान्य नाही. केवळ माझ्यावर जाणुन बुजून नोटीसचे उत्तराकडे दुर्लघ करुन चौकशी बसवुन माझ्यावर अन्याय केला आहे व माझे मानसीक व शारीरिक (त्रास) व आर्थीक नुकसान झालेले आहे. दिनांक 01.04.19 रोजी मा. आयुक्त साहेब मनपा नांदेड यांच्याकडे दिलेला अर्ज मा. आयुक्त साहेबांनी दि. 06.06.19 रोजी प्रशासनाकडे अर्ज पाठविला असता तो अर्ज प्रशासनाने स्विकारण्यास नकार दिला.

मला मे. साहेबांनी न्याय मिळवुन द्यावा अन्यथा माझ्यावर झालेला त्रासा पोटी व नुकसाना पोटी योग्य त्या वरिष्ठ कार्यालयाकडे अथवा योग्यत्या न्यायीक यंत्रणेकडे कायदेशीर कार्यवाही नाईलाजाने करावी लागेल.

तरी मे. साहेबांनी माझ्या वरील सांगितलेल्या सर्व बाबींचा विचार करुन माझा निलंबन काळा हा कर्तव्य सेवा काळ म्हणुनल समाविष्ठ करुन माझा एकूण 161 दिवसाचा निलंबन काळा हा सेवाकाळ त्या दिवसाचा पगार देवुन उपकृत करावे ही विनंती.

**अर्जदार**

**स्वाक्षरीत/-**

**श्रीमती महामती गौतमी हंकारे, रा. पिवळी गिरणी, नांदेड**

**<u>प्रशासकिय अहवाल</u>**

श्रीमती महामती गौतमी हंकारे, सेवानिवृत्त सहशिक्षीका यांनी दि. 16.02.17 ते 26.07.17 (161) दिवसाचा निलंबन काळा हा सेवाकाळ धरुन त्या दिवसाचे वेतन देण्याकरिता नगरसचिव कार्यालया मार्फत अपिल आस्थापना विभागास दिनांक 24.06.19 रोजी प्राप्त झालेली आहे.

श्रीमती महामती गौतमी हंकारे, सेवानिवृत्त सहशिक्षीका हया मनपा प्राथमिक शाळा भिमसंदेश कॉलनी येथे कार्यरत असतांना संबंधीतांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/15595/ दिनांक 16.02.16 अन्वये निलंबीत करण्यात आले आहे.

संबंधीतांना कार्यालयीन ज्ञापन क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/4063/16 दिनांक 22.06.17 अन्वये ज्ञापन व जोडपत्र 01 ते 04 बजावण्यात आले असुन त्याव्दारे संबंधीताविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारांपाबाबत खुलासा मागविण्यात आला असता संबंधीतांनी दिनांक 27.06.17 अन्वये खुलासा सादर करुन त्यांच्या विरुध्द लावण्यातआलेले दोषारोप अमान्य केल्यामुळे संबंधीता विरुध्द कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/5864/17 दि. 26.07.17 अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. तसेच कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/7628/19 दिनांक 31.08.18 अन्वये संबंधीतास विभागीय चौकशीच्या अधिन राहुन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले.

संबंधीताविरुध्द विभागीय चौकशी पुर्ण करुन चौकशी अधिका-यांनी याचा चौकशी अहवाल दिनांक 20.02.18 अन्वये अहवाल सदर केलेला आहे संबंधीताविरुध्द लावण्यात आलेले 04 दोषारोप पैकी दोषारोप क्रं. 03 हा अंशतः सिध्द झाला व दोषारोप क्रं. 1, 2 व 4 सिध्द झाले नसल्याचा अहवाल सादर केलेला आहे.

संबंधीताविरुध्द लावण्यात आलेला दोषारोप क्रं. 3 हा अंशतः सिध्द झाला असल्यामुहे तसेच संबंधीत हया दिनांक 31.03.18 रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) 1979 चे नियम 5 मधील तरतुदीनुसार शास्ती न लावता कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/16278/19 दिनांक 05.02.2019 च्याआदेशान्वये संबंधीताचा दिनांक 16.02.17 ते 26.07.17 पर्यंतचा 161 दिवसाचा निलंबन कालावधी हा निलंबनकाळ गृहीत धरण्यात आलेला आहे.

तदनंतर संबंधीतांनी दिनांक 18.02.19 अन्वये अर्ज करुन निलंबन कालावधी कर्तव्यकाळ करण्याकरिता विनंती केलेली होती. त्यानुसार संबंधीतास निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ करता येणार नाही असे कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/ आस्था-7/17033/19 दि 22.02.19 अन्वये सबंधीतास कळविले आहे.

सबंधीतांनी पुनश्च दिनांक 01.04.19 अन्वये अर्ज करुन निलंबन कालावधी कतव्यकाळ करण्याकरिता विनंती केलेली होती त्यानुसार कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/1017/19 दिनांक 07.05.2019 अन्वये संबंधीताचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ करता येणार नाही असे अंतिमः संबंधीतास कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56(4) नुसार कोणत्याही अधिका-यास / कर्मचा-यास जबर शास्ती लादलेली असेल, शास्ती लादलेला आदेश कळवल्यापासुन एक महिण्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करण्याची तरतुदी आहे.

तथापि संबधीतांना वरिष्ठ प्राधिकरणाकडे एक महिण्याच्या आत अपिल केलेले नाही चौकशी अहवालानुसार संबंधीतावर लावण्यात आलेला दोषारोप क्रं. 3 व अंशतः सिध्द होत असल्यामुहे संबंधीत हया दिनांक 31.03.2018 रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) 1979 चे नियम 5 मधील तरतुदीनुसार शास्ती न लावता संबंधीताचा दिनांक 16.02.17 ते 26.07.17 पर्यंतचा (161) दिवसाचा निलंबन कालावधी हा निलंबनकाळ गृहीत ध्रण्यात आलेला आहे त्यामुळे रद्द किंवा त्यात बदल करता येणार नाही.

**सभापती** प्रशासकिय टिप्पणीनुसार मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 15** **ठराव**

श्रीमती महामती गौतमी हंकारे, सेवानिवृत्त सहशिक्षीका यांनी दि. 16.02.17 ते 26.07.17 (161) दिवसाचा निलंबन काळा हा सेवाकाळ धरुन त्या दिवसाचे वेतन देण्याबाबत सविस्तर अपिल स्थायी समितीपुढे सादर केली होती.

त्यानुसार प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56(4) नुसार कोणत्याही अधिका-यास / कर्मचा-यास जबर शास्ती लादलेली असेल, शास्ती लादलेला आदेश कळवल्यापासुन एक महिण्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करण्याची तरतुदी आहे.

तथापि संबधीतांना वरिष्ठ प्राधिकरणाकडे एक महिण्याच्या आत अपिल केलेले नाही चौकशी अहवालानुसार संबंधीतावर लावण्यात आलेला दोषारोप क्रं. 3 व अंशतः सिध्द होत असल्यामुळे श्रीमती महामती गौतमी हंकारे सेवानिवृत्त सह शिक्षीका हया दिनांक 31.03.2018 रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) 1979 चे नियम 5 मधील तरतुदीनुसार शास्ती न लावता संबंधीताचा दिनांक 16.02.17 ते 26.07.17 पर्यंतचा (161) दिवसाचा निलंबन कालावधी हा निलंबनकाळ गृहीत ध्रण्यात आलेला आहे त्यामुळे रद्द किंवा त्यात बदल करता येणार नसल्याचे प्रशासकिय टिप्पणीत नमुद केलयानुसार संबंधीतांचा निलंबनकाळ सेवाकाळ धरुन त्या दिवसाचे वेतन देण्याबाबत केलेली अपिल हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नामंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेला</u>

**विषय -**

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 16 अंतर्गत सि. सि. रस्ता करणे (रुपये 60,00,000/-)

**महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 16 अंतर्गत सि.सि. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 60,00,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/1772/2019 दिनांक 07.03.2019 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय/दैनिक रिपब्लीकन गार्ड या वृत्तपत्रातदिनांक 08.03.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदसयी समितीसमोरदिनांक 04.06.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | |
|---|---|---|---|
| 01 | मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड | 0.99% कमी दर | L-1 |
| 02 | मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दर | L-2 |
| 03 | मे. जि.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 6.21% जास्त दर | L-3 |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे. परंतु मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड हे त्यांची आर्थीक परिस्थिती खराब असल्यामुळे सदरचे काम करण्यास तयार नाहीत असे लेखी कळविले आहे. त्यामुहे मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड हे L-2 निविदाकार असल्याने त्यांना L-1 च्या दरावर काम करण्यास तयार आहे किंवा कसे याकरिता कार्या. पत्र क्रं. नावाशमनपा/ साबांवि/2918/219 दिनांक 28.06.2019 अन्वये कळविले असता त्यांनी दिनांक 01.07.2019 रोजी लेखी पत्र देवुन सदर काम हे L-1 च्या दरावर म्हणजेच अंदाजपत्रकिय दरापेक्षा दरापेक्षा 0.99% कमी दरावर काम करण्यास तयार आहोत असे लेखी कळविले आहे.

करिता सदर कामासाठी मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 16** **ठराव**

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 16 अंतर्गत सि. सि. रस्ता करणे (रुपये 60,00,000/-)

**महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 16 अंतर्गत सि.सि. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 60,00,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/1772/2019 दिनांक 07.03.2019 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय/दैनिक रिपब्लीकन गार्ड या वृत्तपत्रातदिनांक 08.03.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदसयी समितीसमोरदिनांक 04.06.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | |
|---|---|---|---|
| 01 | मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड | 0.99% कमी दर | L-1 |
| 02 | मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दर | L-2 |
| 03 | मे. जि.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 6.21% जास्त दर | L-3 |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे. परंतु मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड हे त्यांची आर्थीक परिस्थिती खराब असल्यामुळे सदरचे काम करण्यास तयार नाहीत असे लेखी कळविले आहे. त्यामुहे मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड हे L-2 निविदाकार असल्याने त्यांना L-1 च्या दरावर काम करण्यास तयार आहे किंवा कसे याकरिता कार्या. पत्र क्रं. नावाशमनपा/ साबांवि/2918/219 दिनांक 28.06.2019 अन्वये कळविले असता त्यांनी दिनांक 01.07.2019 रोजी लेखी पत्र देवुन सदर काम हे L-1 च्या दरावर म्हणजेच अंदाजपत्रकिय दरापेक्षा दरापेक्षा 0.99% कमी दरावर काम करण्यास तयार आहोत असे लेखी कळविले आहे.

करिता सदर कामासाठी मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मलनिस्सासरण देखभाल दुरुस्ती करिता झोन निहाय निविदा सुचना मागविण्यात आल्या आहेत.

शहरातील मलनिस्सासरण देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यासाठी नियुक्ती केलेल्या कंत्राटदाराची मुदत संपलेली असल्याने झोन क्रं. 02 व 03 अंतर्गत मलनिस्सासरण दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्याच्या कामे करण्यासाठी अंदाजीत रक्कम रुपये 30.00 लक्षाचे कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

तसेच मलनिस्सासरण देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यासाठी नियुक्ती केलेल्या कंत्राटदाराची मुदत संपलेली असल्याने झोन क्रं. 04 व 05 अंतर्गत मलनिस्सासरण दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्याच्या कामे करण्यासाठी अंदाजीत रक्कम रुपये 35.00 लक्षाचे कामे करण्यासाठी सदरचे दोन्ही कामे हे सालसन 2019-20 मधील संबंधीत लेखा शिर्षकातुन खर्च करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते तसेच उक्त दोन्ही कामाची निविदा स्थायी समितीची मान्यता घेवुनच कार्यारंभ आदेश देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला साब    **अनुमोदक :-** अ. लतीफ अ. मजीद

**सभापती**   स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.** 17

**ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मलनिस्सासरण देखभाल दुरुस्ती करिता झोन निहाय निविदा सुचना मागविण्यात आल्या आहेत.

शहरातील मलनिस्सासरण देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यासाठी नियुक्ती केलेल्या कंत्राटदाराची मुदत संपलेली असल्याने झोन क्रं. 02 व 03 अंतर्गत मलनिस्सासरण दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्याच्या कामे करण्यासाठी अंदाजीत रक्कम रुपये 30.00 लक्षाचे कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

तसेच मलनिस्सासरण देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यासाठी नियुक्ती केलेल्या कंत्राटदाराची मुदत संपलेली असल्याने झोन क्रं. 04 व 05 अंतर्गत मलनिस्सासरण दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्याच्या कामे करण्यासाठी अंदाजीत रक्कम रुपये 35.00 लक्षाचे कामे करण्यासाठी सदरचे दोन्ही कामे हे सालसन 2019-20 मधील संबंधीत लेखा शिर्षकातुन खर्च करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते तसेच उक्त दोन्ही कामाची निविदा स्थायी समितीची मान्यता घेवुनच कार्यारंभ आदेश देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सभापती**   आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **(स. अजीतपालसिंघ संधु)** | **(खान फारुख इलीयाज खान)** |
| **नगरसचिव,** | **सभापती,** |
| नांवाशमनपा, नांदेड. | **स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड. |